दि 11.2.2025

# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आरोपी श्रीमती सिमा प्रभाकर वनकर, वय ५४ वर्ष, पद सहा. शिक्षीका, अति. पदभार मुख्याध्यापिका, अनुसुचीत जाती मुलींची शासकीय निवासी शाळा शेगाव जि. बुलढाणा |
| लाच मागणी | २,१०,०००/— रुपये |
| लाच स्विकारली | ६०,०००/— रुपये |
| घटनास्थळ | मुख्याध्यापक, यांचे कार्यालय, अनुसुचीत जाती मुलींची शासकिय निवासी शाळा शेगाव जि. बुलढाणा |
| घटना तारीख | ११.०२.२०२५ रोजी |

**थोडक्यात हकीकत :—** यातील तक्रारदार हया अनुसुचीत जाती मुलींची शासकीय निवासी शाळा शेगाव ता. शेगाव येथील विदयार्थिनींना भोजन पुरवठा व दुध पुरवठा करीत आहेत. तक्रारदार यांनी भोजन पुरवठा केल्याबाबत ऑगष्ट २०२४ पावेतोचे भोजन बिले तक्रारदार यांना प्राप्त असुन सप्टेंबर २०२४ ते जानेवारी २०२५ पावेतोचे असे एकुण ५ महिन्याचे बिले अप्राप्त आहेत. तसेच डिसेंबर २०२३ पासुन ते शाळा सुरू असल्याचे कालावधीतील म्हणजेच एकूण १२ महिन्याचे दुधाचे बिले अप्राप्त आहेत. भोजन व्यवस्थेबाबत कोणतीही तक्रार न करता भोजन पुरवठयाचे बिल काढण्याकरीता विदयार्थीनींचा दैनंदिन उपस्थिती अहवाल दरमहा सहा. आयुक्त, समाज कल्याण कार्यालय बुलढाणा येथे सादर केल्याबाबतचा मोबदला म्हणुन प्रभारी मुख्याध्यापिका श्रीमती सिमा वनकर हया २,१०,०००/— रू. लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती.

त्यानुसार दिनांक १०.०२.२०२५ रोजी लाचमागणी पंचासमक्ष पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता, लोकसेविका श्रीमती सिमा वनकर यांनी तक्रारदार यांना भोजन बिलाचे प्रतीमाह ३०,०००/— प्रमाणे ५ महिन्याचे एकुण १,५०,०००/— रू. व दुध पुरवठा बिलाचे प्रतीमाह ५,०००/— रू. प्रमाणे १२ महिन्याचे ६०,०००/— रू. असे एकुण २,१०,०००/— रू. लाचेची मागणी करुन भोजन बिलाच्या लाचेचा पहीला हप्ता म्हणून दोन ६०,०००/— रुपये दिनांक ११.०२.२०२५ रोजी तसेच उर्वरीत लाच रक्कम बिले प्राप्त झाल्यानंतर स्विकारण्यास संमती दर्शविली. त्यावरुन दिनांक ११.०२.२०२५ रोजी आयोजीत सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्रीमती सिमा प्रभाकर वनकर, पद सहा. शिक्षीका, अति. पदभार मुख्याध्यापक वय ५४ वर्ष, अनुसुचीत जाती मुलींची शासकीय निवासी शाळा शेगाव जि. बुलढाणा यांनी तक्रारदार यांच्याकडुन पंचासमक्ष भोजन बिलाच्या २ महिन्याचा पहीला हप्ता ६०,०००/— रुपये स्विकारून लोकसेवक या नात्याने गैरमार्गाने कर्तव्य पार पाडल्याचा मोबदल्याच्या स्वरुपात स्वतःचा आर्थिक गैरलाभ करुन घेतला त्यावरून लोकसेविका यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन शेगाव शहर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

**सदर कार्यवाही :—**

१.मा.श्री.मारुती जगताप,पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती

२.मा.श्री.सचिंद्र शिंदे, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा, सापळा पथक पोलीस निरीक्षक रमेश पवार, पोहेकॉ. प्रविण बैरागी, राजेंद्र क्षिरसागर, पोना/विनोद लोखंडे, जगदीश पवार, पोकॉ.रंजित व्यवहारे, मपोकॉ. स्वाती वाणी, चानापोकॉ/नितीन शेटे, अरशद शेख, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा, कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी केले आहे.

**(श्रीमती शितल घोगरे)**
पोलीस उपअधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा